**महाळुंगे MIDC पोलीस स्टेशन,**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.**
**फोन क्रमांकः ७०२८५३५३२३.**

# प्रेस नोट. दि. ०८/१०/२०२४.

## पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे माध्यमातुन
## " चाकण एमआयडीसी परीसरातील वाहतुक समन्वय बैठक तसेच पोलीस प्रशासन व एमआयडीसी परीसरातील मधील कंपनी व्यवस्थापक यांची बैठक "

**वाहतुक समन्वय बैठक -**

दिनांक ०८/१०/२०२४ रोजी सकाळी ११/३० वा. टेट्रा पॅक कंपनी, पत्ता- मिटींग हॉल, वासुली, ता. खेड, जि. पुणे, येथे एमआयडीसी परीसरातील वाहतुकीच्या समस्येच्या अनुषंगाने श्री. विनयकुमार चौबे, मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, यांचे प्रमुख उपस्थितीत वाहतुक समन्वय बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस वाहतुक विभाग पिंपरी चिंचवड, MIDC विभाग, NHAI विभाग, प्रादेशिक परीवहण विभाग पिंपरी चिंचवड, माथाडी बोर्ड, महसुल विभाग, PMRDA विभागाचे अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकी मध्ये दिनांक १/८/२०२४ रोजी घेण्यात आलेल्या आढावा बैठकिमध्ये ठरविण्यात आलेल्या उपाय योजनांच्या पुर्तता केल्या संबधी आढावा घेण्यात आला. तसेच भविष्यात जड अवजड वाहणांच्या पार्कींगसाठी नव्याने जागा उपलब्ध करणे संबधी चर्चा करून नियोजन करण्यात आले.

**पोलीस विभाग व महाळुंगे एमआयडीसी मधील कंपनी व्यवस्थापक यांची बैठक -**

त्यानंतर दुपारी १२/३० वा. सुमारास टेट्रा पॅक कंपनी, वासुली, येथील दुस-या बैठक हॉलमध्ये, कंपन्यांना भेडसावणारे प्रश्न, वाहतुक समस्या, माथाडी व इतर समस्यांकरीता प्रथम बैठकीस उपस्थित असलेले श्री. विनयकुमार चौबे, मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड व वरील विभाचे पदाधिकारी यांचे प्रमुख उपस्थितीत पोलीस विभाग व महाळुंगे एमआयडीसी मधील कंपनी व्यवस्थापक यांची बैठक आयोजित करण्यात आलेली होती.

डॉ. श्री. शिवाजी पवार, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ०३, यांनी सदर बैठकीची प्रस्तावना केली. त्यानंतर वरील मान्यवर यांनी उपस्थित कंपन्याचे प्रतिनिधींशी थेट संवाद साधुन, त्यांच्या अडीअडचणी जाणुन घेवुन त्याचे निराकरण करण्यात आले. त्यामध्ये विशेषतः रस्ते, दररोज होणारी ट्रॅफिक जॅम, अवजड वाहनांची पार्किंग, कचरा, इत्यादी महत्वाच्या विषयांवर चर्चा झाली. सदर समस्या सोडविण्यासाठी करण्यात येणा-या उपाय योजना बाबत तसेच भविष्यातील आराखाडया बाबत माहीती देण्यात आली.

श्री. विनयकुमार चौबे, मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, यांनी उपस्थित कंपनीचे प्रतिनिधी यांना संबोधीत करताना खालील नमुद मुद्यांवर मार्गदर्शन केले.

१. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामधील महाळुंगे भागातील औद्योगिक परिसराकरीता सन २०२३ मध्ये महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणेची वेगळी निर्मिती करण्यात आलेली असुन, सदर पोलीस ठाण्यास ०२ पोनि, ०६ अधिकारी व एकुण १०७ पोलीस अंमलदार यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.
२. नागरीकांनी ११२ हा क्रमांक डायल केल्यानंतर अंदाजे पुढील ५ ते ६ मिनीटात त्यांना पोलीस मदत उपलब्ध होते. औद्योगिक क्षेत्रातील व्यक्तींनी सदर सेवेंचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. तसेच जास्तीत जास्त प्रसार करावा.
३. औद्योगिक तक्रारीचे तात्काळ निवारण होणेकरीता पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे गुन्हे शाखेच्या अंतर्गत येणा-या खंडणी विरोधी पथकामध्ये औद्योगिक तक्रार निवारण कक्ष (इंडस्ट्रियल ग्रिव्हियन्स सेल) स्थापन

केल्याची माहिती देण्यात येवुन, त्याव्दारे औद्योगिक परीसरातील समस्यांची त्वरीत सोडवणुक केली जाते.

४. महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे अंतर्गत एकुण- ०६ गुन्ह्यामध्ये मोक्का कायद्यांतर्गत एकुण- ३९ गुंडांवर कठोर कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच एमपीडीए अंतर्गत एकुण- ०५ गुंडांवर प्रभावी प्रतिबंधक कारवाई सुरु करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे एकुण- २६ गुंडांना पुणे जिल्ह्यातुन हद्दपार करण्यात आलेले आहे.
५. कोणतीही समस्या, दादागीरी, अडचण, तसेच माथाडी कामगारांच्या संबंधी काहीएक तक्रार असल्यास, समक्ष पोलीस स्टेशनला तक्रार द्यावी, तसेच पोलीस आयुक्तालयामधील खंडणी विरोधी पथकांतर्गत नव्याने स्थापन झालेल्या औद्योगिक तक्रार निवारण कक्ष (इंडस्ट्रियल ग्रिव्हियन्स सेल) येथे तक्रार केल्यास तात्काळ मदत मिळेल.
६. कंपनी व्यवस्थापनाने कंपनीच्या आतील भागाप्रमाणेच कंपनीच्या बाहेरील जागेमध्ये, सार्वजनिक रस्त्यावर चांगल्या दर्जाचे हाय डेफिनेशन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत आवाहन करुन सदर कॅमेरे यांची साठवणुक क्षमता किमान ३० दिवसांची असावी अशी सुचना केली.
७. कंपनी व्यवस्थापनाने त्यांचे कामगारांचे मोटारसायकल व चारचाकी गाड्या ह्या कंपनीचे बाहेर रोडवर पार्किंग न करता, कंपनीचे गेटचे आत पार्किंगची सोय करावी, जेथे पार्किंग करणे शक्य नसल्यास तेथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावे तसेस सुरक्षा रक्षक नेमण्यात यावा.
८. कंपनी व्यवस्थापनास काहीएक तक्रार असल्यास, त्यांनी पुढे येवुन तक्रार दिल्यास, पोलीस विभागाकडुन त्यांना तात्काळ मदत मिळुन, गुन्हेगारांवर कडक कायदेशिर कारवाई करण्यात येईल, असे सांगुन, महाळुंगे एमआयडीसीमध्ये भयमुक्त वातावरण ठेवण्याचा उद्देष असल्याचे सांगीतले.

एमआयडीसी भागात असलेले कारखाने टिकवण्यासाठी आम्ही प्रयत्नशी आहोत. यात कोणी स्थानिक गुंड, कामगार संघटना किंवा माथाडी कामगार विनाकारण कंपनी व्यवस्थपनास त्रास देत असल्यास, त्यांचेवर कडक कारवाई केली जाईल, असे सांगीतले.

सदर बैठकीस १) श्री. बापु बांगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड, २) डॉ. शिवाजी पवार, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ०३ पिंपरी चिंचवड, ३) श्री. राजेंद्रसिंह गौर, सहा. पोलीस आयुक्त, चाकण विभाग, ४) श्री. अनिल कोळी, सहा. पोलीस आयुक्त, वाहतुक विभाग, ५) श्री. सतिश चौडेकर, कार्यकारी अभियंता, एमआयडीसी विभाग, ६) श्री. संदेश चव्हाण, प्रादेशिक परीवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड ७) श्री. दिलीप शिंदे, उप अभियंता, एनएचएआय, ८) श्री. निखील वाळके, सहा. कामगार आयुक्त, माथाडी बोर्ड, ९) श्री. राम बिजे, नायब तहसिलदार, खेड, पुणे, व १०) श्री. जितेंद्र पगार, सेक्शन इंजिनिअर, पीएमआरडीए पुणे, तसेच श्री. नितीन गिते, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, महाळुंगे एमआयडीसी पोलीस स्टेशन, श्री. देवेंद्र चव्हाण, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, खंडणी विरोधी पथक, श्री. प्रमोद वाघ, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, चाकण पोलीस स्टेशन व श्री. दिगंबर सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक, सामाजिक सुरक्षा विभाग हे हजर होते. सोबत चाकण एमआयडीसीमधील महत्वाच्या कंपन्यांचे प्रतिनिधी ज्यामध्ये टेट्रा पॅक कंपनीचे श्री. संतोष सोनटक्के व श्री विशाल देशमुख, महेश खर्डेकर, मर्सिडीज कंपनीचे श्री. सारंग जोशी, न्यु हॉलंड कंपनीच्या श्रीमती. शितल साळुंखे तसेच महाळुंगे व चाकण, एमआयडीसीमधील विविध कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. श्री. बापु बांगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड, यांनी सर्वांचे आभार मानुन, उपस्थित मान्यवरांच्या वतीने बैठक संपली असे जाहीर केले. नमुद बैठकीकरीता सुमारे १००-१२० कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**(डॉ. शिवाजी पवार)**
**पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ०३**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय**